Lokmat, Sunday 20.6.84

सांस्कृतिक विदर्भ

# कथ्थक साधना केन्द्राचा वार्षिकोत्सव




नवोदित विद्यार्थी व हौशी कलावंतांना त्यांच्या कलागुणाला प्रेरणा व संधी देण्याच्या दृष्टीने वार्षिकोत्सवासारख्या विविध कार्यक्रमांचे आयोजन आवश्यक असते. नागपुरातील माधवनगरात नृत्य प्रचार-प्रसार करणाऱ्यांच्या कथ्थक साधना केन्द्र या संस्थेचा तृतीय वार्षिकोत्सव पी.एम.जी. हॉलमध्ये दि. २४ जूनला संपन्न झाला. उत्सवाचे अध्यक्षस्थान प्रसिद्ध संगीतज्ज्ञ समीक्षक डॉ.नारायणराव मंगरुळकर यांनी मंडित केले होते तर प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध नृत्यांगना कु.काजल शर्मा यांनी विभूषित केले होते.

संस्थेच्या संचालिका व नृत्यांगना सौ.ललिता हरदास यांनी संस्थेचा परिचय करून दिला. प्रास्ताविक निवेदन केले आणि श्रीमती काजल शर्मा यांनी दीप प्रज्वलन केले. डॉ.मंगरुळकर यांनी प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला. नंतर पाठोपाठ छोट्या मोठ्या विद्यार्थ्यांचे नृत्य सुरू झाले.

गणेशवंदन, शिवपरण, दीपनृत्य, गतभाव कथ्थक, झपगल, त्रितालमधील प्रकार तिहाई वृन्दावनातील कृष्ण लीला, होळी गीत, आळशी सूर्यफूल (नृत्यनाटिका) द्रौपदी वस्त्रहरण (एक पात्री) रामायणातील रामलीला वगैरे विविध नृत्याविष्कार संस्थेतील मुलींनी अत्यंत कौशल्याने सादर करून रसिकांना मुग्ध केले.

भाग घेणारे कलावंतः- क्षितीज व क्षमा हरदास, सुनिता बगाले, गौरी काळे, सुहासिनी ओक, भाग्यश्री मोघे, नीम मिश्रा, सुमित्रा शास्त्री, प्राजक्ता टिकले, प्रफुल्ल खोलकुटे, कोमली राव, मोनिका बोरीकर, मंजिरी दाणी, प्रिशा नायक, रश्मी गंगणे, स्मिता मुळे, वैशाली पिंपरकर, मीना खरबंदा, कामरू राव, पल्लवी इत्यादींनी आपापल्यापरी हावभावासह नृत्य पेश केले. कलेविषयी जिज्ञासा, रियाज व कुशल मार्गदर्शनाचा प्रत्यय आला.

नृत्याविष्काराला साथसंगतही उत्तम लाभली. सौ. सुमन चौधरी (गायन), बबनराव दयाळ (गायन हार्मोनियम), देवानंद गडीकर (मृदंग), राम गडीकर (हार्मोनियम), शांतीकुमार (तबला) व विनोद गडीकर यांनी साथ उत्तम केली. संपूर्ण दिग्दर्शन व निवेदन संचालिका सौ.ललिता हरदास यांनी सुस्पष्ट व उत्तम केले.

उत्सवाचे अध्यक्ष डॉ.नारायणराव मंगरुळकर यांनी समयोचित भाषण करून संस्थेला शुभेच्छा व्यक्त केल्या. तसेच प्रमुख अतिथी श्रीमती काजल शर्मा यांनी संस्थेचे, विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र देण्यात आले. शेवटी प्रा.हरदास यांनी आभारप्रदर्शन केले.

